An International Peer Reviewed & Referred

INTERNATIONAL JOURNAL
OF EDUCATIONAL RESEARCH STUDIES

# शिक्षक शिक्षणाची चिंता व काळजी

**प्रा. घावटे भारत चंद्रकांत**

एम.ए.एम.एड्, सेट (शिक्षण शास्त्र ) शिक्षण शास्त्र महाविद्यालय सोनई,

---

जागतिकीकरणाच्या युगात शिक्षक शिक्षणाचे महत्व दिवसेनदिवस वाढच आहे. प्रत्येक स्तरामध्ये सामाजिक परिवर्तन घडून येताना दिसते शिक्षकांना उद्याच्या परिवर्तनाला सामोरे जाणारा, समायोजित होणारा सक्षम विद्यार्थी घडवायचा आहे. या साठी समाजाच्या बदलत्या गरजा व नवनविन प्रवाहांमुळे शिक्षक शिक्षणाच्या संकल्पना उद्दीष्टांनमध्ये बदल करणे गरजेचे आहे. शिक्षक शिक्षणाने सुशिक्षित मनुष्यबळ तयार करणे हे उद्दीष्ट डोळ्यासमोर ठेवून शिक्षण, संशोधन व प्रशिक्षणाचा सुयोग्य वापर करणे ही सद्य स्थीतीची गरज आहे.

शिक्षकाने आपली भूमिका लक्षात घेवून नव्या समाज परिवर्तनाचा शिल्पकार होणे गरजेचे आहे. समाजरचनेत इष्ट ते बदल घडून आणण्याचे कार्य शिक्षकालाच करावयाचे असते. सर्वांना शैक्षणिक संधी मिळावी हे आपल्या घटनेचे निर्देशक तत्व आहे. परंतु शिक्षकाने केवळ ज्ञानदान करुन चालणार नाही. नविन शिक्षण शास्त्रा प्रमाणे शिक्षणाचे अंतिम उद्दीष्ट विद्यार्थ्याचा शारिरीक मानसिक , बौद्धीक व सामाजिक विकास म्हणजे विद्यार्थ्याचा सर्वांगिन विकास होय. अध्यापन ही एक विकासात्मक प्रक्रिया आहे. आपल्या अध्यापनात शिक्षकांना विविध विषयाची माहिती विद्यार्थ्यान पर्यत पोहचावी लागते. परंतु केवळ माहिती पोहचविण्याची क्रिया म्हणजे आध्यापन नव्हे तर विद्यार्थ्यांनी मिळालेल्या माहितीचा उपयोग प्रत्यक्ष जीवनात करणे म्हणजे शिक्षकाने केलेल्या आध्यपनाचे खरे सार्थ होय.

परंतु भारतीय समाजातील शिक्षकांचे उच्च व माननीय स्थान आलिकडे घसरत चालले आहे. त्यांचे स्थान उंचवण्यास केंद्र व राज्य शासन प्रयत्नशिल आहेत. तरीपण शिक्षकाचे कार्य समाजापसुन अलग होवू लागले आहे. अभ्यास क्रमाचा, अध्यापन पद्धतीचा अभूतपुर्व विस्तार झाला आहे. शिक्षक प्रशिक्षणाचा दर्जा

निकृष्ट होत आहे. त्यामुळे समाजात शिक्षकाला पुरेसे मानाचे स्थान आजच्या परिस्थितीत दिले जात नाही. पुर्वीप्रमाणे शिक्षक हा विद्यादान हे व्रत म्हणून स्विकारण्याची वृत्ती आता नाही. शिक्षकाचा दृष्टीकोण संकुचीत बनत चालला आहे. या मुळे शिक्षक शिक्षणा बद्दल चिंता व काळजी निर्माण झालेली आपणास दिसत आहे.

**शिक्षक शिक्षणातील दोष**

१. विद्यार्थ्याची वाढती अनुपस्थीती.

२. शिक्षक प्रशिक्षणाचा वाढलेला कालावधी.

३. डी.टी.एड् , बी.एड्, एम.एड् बद्दल विद्यार्थ्याची असलेली निराशा

४. पर्याप्त सुविधांचा अभाव

५. वाढते शैक्षणिक शुल्क

६. सदोष अभ्यासक्रम

७. विद्यार्थ्या मध्ये व्यवसायिक दृष्टीचा अभाव

८. महाविद्यालयानमध्ये प्रशिक्षित शिक्षकांचा अभाव

९. शिक्षकांना मिळणारे अल्प मानधन

१०. आर्थिक अनुदानाची कमतरता

११. शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयांची वाढती संख्या

१२. विद्यार्थ्या मध्ये आत्म विश्वसाची कमतरता

१३. शिक्षण शास्त्र महाविद्यालया संदर्भात समाजाचा नकारात्मक दृष्टीकोण

१४. राजकिय संस्थांचा महाविद्यालयाकडे पहाण्याचा फक्त अर्थजनाचा दृष्टीकोण

१५. शिक्षण शास्त्र महाविद्यालया बाबत घेण्यात येणाऱ्या निर्णयाबाबत विद्यापीठ व शासनाकडून अति दिरंगाई

१६. सी.टी.ई.टी., सी.ई.टी., टी.ई.टी परिक्षे मध्ये होणारा हस्तक्षेप.

१७. शिक्षक भरती मध्ये अनेक समस्या

अशा अनेक समस्यांमुळे शिक्षक शिक्षणामध्ये चिंतेचे कारण तयार झाले आहे. या सर्व समस्या सोडविण्यासाठी शासन कमी पडत आहे. व विद्यापीठाकडूनही हवे ते निर्णय घेण्यासाठी अतिकालावधी जात

आहे. या सर्व समस्या सोडविण्यासाठी शासन, विद्यापीठे व एन.सी.आर.टी या सारख्या संस्थांना योग्य निर्णय वेळीच घेणे अपरिहार्य आहे.

शिक्षक शिक्षणातील एक महत्वाची समस्या म्हणजे शिक्षण प्रशिक्षणातील होय. आज दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणामध्ये अनेक उणिवा आहेत. गुणवत्ता विकासासाठी संपुर्ण शिक्षण प्रक्रियेत प्रशिक्षण अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडते कारण शिक्षण प्रक्रियेत विद्यार्थी शिक्षक व अभ्याक्रम हे महत्वाचे घटक आहेत. शिक्षकांचे वर्तनाचे अनुकरण विद्यार्थी करत असतात. विद्यार्थ्यांत कोणत्या प्रकारचे वर्तन परि वर्तन अपेशित आहे. या बद्दलची सामाजिक तात्वीक व मानसशास्त्रीय जाणिव असलेला शिक्षक निर्माण करावा लागतो.

आज सेवा पुर्व प्रशिक्षणाच्या उद्दीष्टांची परिपुर्ती होत नाही असे दिसून येते शिक्षणाने समाज परिवर्तन घडून येते असे म्हणतात आणि हे शिक्षण ज्या शाळा मधून दिले जाते. त्या शाळांचा दर्जा हा तेथे काम करणाऱ्या शिक्षकांवर अवलंबून असतो. आज जरी शिक्षणामध्ये नविन विचार प्रवाह आणले असले तरी ग्रामीण स्तरावर ते आजही पोहचलेले नाही तेथे असणाऱ्या त्या शाळांच्या समस्या शिक्षकांच्या समस्या विद्यार्थ्यांच्या समस्या ह्या जरी सोडविण्याचा प्रयत्न होत असला तरी ही त्या आजही तशाच आहेत. व त्या सोडविण्याची नितांत आवश्यकता आहे.

**उपाययोजना**

१. शिक्षक प्रशिक्षणार्थी साठी कमवा आणि शिका या तत्वाचा वापर प्रत्यक्ष अध्यपणात करणे जो फक्त कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालया मध्ये आहे. त्यातुन विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढुन मुलांच्या शैक्षणिक शुल्काचा प्रश्न सुटेल.

२. डी.टी.एड्, बी. एड्, एम.एड् महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष क्लासेस कशा पद्धतीने घ्यावयाचे याचे प्रत्यक्ष मागदर्शन करणे तसेच कोणत्याही विषयाचा विद्यार्थी असला तरी त्याला सर्व विषयाचे ज्ञान अवगत असावे यासाठी शिक्षकाने प्रयत्न करणे व शिक्षक स्वत: निपुन असावा.

३. अभ्यासक्रमामध्ये कमवा आणि शिका याघटकांचा सामावेश कराव

४. विद्यापीठ नियमानुसार सर्व डी.टी.एड्, बी. एड्, एम.एड् महाविद्यालयामध्ये सेट नेट गुणवत्ता धारकच प्राध्यपकांचा सामावेश करावा किंवा सर्व शिक्षक हे गुणवत्ता धारकच असणे अवश्यक असा नियम विद्यापीठाने करणे त्यासाठी कोणतेही इतर मार्ग नसावे

५. ज्या विद्यालयाचे प्रवेश पुर्ण असतील त्या महाविद्यालयांना विद्यापीठांने काही प्रमाणात अनुदान द्यावे त्यातुन विद्यार्थ्यांचे प्रश्न सुटतील तसेच शिक्षकाच्या मासिक वेतना संदर्भात विद्यापीठाने काही अटी लागू करुन शैक्षणिक संस्थांवर नियंत्रण अणावे

६. शासन व विद्यापीठाने नियम करताना त्या मध्ये फार उशीर न लावता लवकरात लवकर निर्णय घ्यावे

७. सी.टी.ई.टी., सी.ई.टी., टी.ई.टी या परिक्षे मध्ये होणाऱ्या हस्तक्षेपावर नियंत्रण आणावे .

**संदर्भ ग्रंथ**

*डॉ. यु के घोरमोडे, डॉ. कला कृष्णा घोरमोडे **शिक्षकांचे शिक्षण** विद्या प्रकाशन नागपुर*

*डॉ. न.रा. पारसनीस **शिक्षकांचे प्रशिक्षण** नुतन प्रकाशन*

*डॉ. चंद्रकांत मोरे, डॉ. सदानंद भिलेगावकर **शिक्षक शिक्षण** नित्य नुतन प्रकाशन*

*डॉ. किशोर चव्हाण, **शिक्षक शिक्षण** इनसाईट पब्लीकेशन नाशिक.*

*प्रा. अरुण सांगोलकर **नविन जागतीक समाजातील शिक्षणाचे विचार प्रवाह** इनसाईट पब्लीकेशन नाशिक.*

*डॉ. अरविद दुनाखे **शिक्षक प्रशिक्षण** नित्य नूतन प्रकाशन*